पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिति

कार्यपत्रिका क्रमांक - ११

**सभावृत्तांत**

दिनांक - १४/०१/२०१५ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१४/०१/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा. जाधव साधना रामदास - सभापती**
**२.** मा. सौ.पानसरे अमिना महंमद
**३.** मा. काळभोर वैशाली जालिंदर
**४.** मा. आल्हाट मंदा उत्तम
**५.** मा. सौ.स्वाती प्रमोद साने
**६.** मा. बो-हाडे शुभांगी संजय
**७.** मा. भालेकर अरुणा दिलीप
**८.** मा. पवार संगीता शाम

या शिवाय मा.कुलकर्णी - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले - समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - सहा.प्रकल्प अधिकारी, मा.बहाद्दरपुरे - सहा.समाजविकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक २४/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १०)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : १६ विषय क्रमांक : १
दिनांक : १४/०१/२०१५ विभाग : नागरवस्ती विकास योजना
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.शुभांगी बो-हाडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे प्रत्र क्र.नाविवयो/४/कावि/२९३/२०१४, दि.३१/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावा सोबतचे प्रपत्र “ अ ” नुसार अभियांत्रिकी पदविकेसाठी पात्र १५ लाभार्थींना प्रत्येकी र.रु.७,५००/- (अक्षरी र.रु.सात हजार पाचशे फक्त) प्रमाणे र.रु.१,१२,५००/- (अक्षरी

र.रु.एक लाख बारा हजार पाचशे फक्त) खर्च अपेक्षित आहे. सन २०१४-१५ ची मुळ तरतूद र.रु.१०,००,०००/- होती परंतु अर्जांचा विचार करता सन २०१४-१५ च्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये र.रु.२,५०,०००/- एवढी सुधारित तरतूद सुचविणेत आलेली आहे. सन २०१४-१५ मध्ये आज अखेरपर्यंत कोणतीही रक्कम खर्ची पडली नाही. त्या अनुषंगाने शिल्लक असलेल्या तरतूद रकमेमधून सदर अर्थसहाय्याची रक्कम अदा करणेस तसेच जे अपात्र लाभार्थी त्रूटी पुर्ततेनंतर पात्र ठरतील त्यांना सन २०१५-१६ अखेर सदर अर्थसहाय्य देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १७ विषय क्रमांक : २

दिनांक : १४/०१/२०१५ विभाग : नागरवस्ती विकास योजना

सुचक : मा.अमिना पानसरे अनुमोदक : मा.मंदा आल्हाट

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे प्रत्र क्र.नावियो/४/कावि/२९४/२०१४, दि.३१/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावा सोबतचे प्रपत्र “ अ ” नुसार पात्र लाभार्थींस आई व मुलगी यांचे संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये मुलीच्या जन्म दिनांकापासून अठरा वर्षापर्यंत कालावधीसाठी मुदतठेव पावती स्वरुपात पहिल्या मुलीवर शस्त्रक्रीया करणा-या ५ लाभार्थींना प्रत्येकी र.रु.२५,०००/- प्रमाणे र.रु.१,२५,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख पंचवीस हजार फक्त) व दोन मुलींवर शस्त्रक्रीया करणा-या १०३ लाभार्थींना प्रत्येकी र.रु.१०,०००/ प्रमाणे र.रु.१०,३०,०००/- (अक्षरी र.रु. दहा लाख तीस हजार फक्त) असे एकूण र.रु.११,५५,०००/- (अक्षरी र.रु.अकरा लाख पंचावन्न हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे. सन २०१४-१५ ची मुळ तरतूर र.रु.१७,५०,०००/- होती परंतु वाढत्या अर्जांचा विचार करता सन २०१४-१५ च्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये र.रु.३५,००,०००/- एवढी सुधारित तरतूद सुचविणेत आलेली आहे. सन २०१४-१५ मध्ये पात्र ठरलेल्या लाभार्थींना आज अखेरपर्यंत र.रु.५,६०,०००/- एवढी रक्कम खर्ची पडली आहे. त्या अनुषंगाने शिल्लक असलेल्या तरतूद रकमेमधून सदर अर्थसहाय्याची रक्कम अदा करणेस तसेच जे अपात्र लाभार्थी त्रूटी पुर्ततेनंतर पात्र ठरतील त्यांना सुध्दा सन २०१५-१६ अखेर सदर अर्थसहाय्य देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १८ विषय क्रमांक : ३
दिनांक : १४/०१/२०१५ विभाग : नागरवस्ती विकास योजना
सुचक : मा.स्वाती साने अनुमोदक : मा.शुभांगी बो-हाडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे प्रत्र क्र.नावियो/४/कावि/२९५/२०१४, दि.३१/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावा सोबतचे प्रपत्र “ अ ” नुसार ११७ पात्र लाभार्थींना प्रत्येकी र.रु.३,०००/- (अक्षरी र.रु.तीन हजार फक्त) प्रमाणे र.रु.३,५१,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख एक्कावन्न हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे. सन २०१४-१५ ची मुळ तरतूर र.रु.८,००,०००/- होती परंतु अर्जांचा विचार करता सन २०१४-१५ च्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये र.रु.४,३०,०००/- एवढी सुधारित तरतूद सुचविणेत आलेली आहे. सन २०१४-१५ मध्ये आज अखेरपर्यंत कोणतीही रक्कम खर्ची पडली नाही. त्या अनुषंगाने शिल्लक असलेल्या तरतूद रकमेमधून सदर अर्थसहाय्याची रक्कम अदा करणेस तसेच जे अपात्र लाभार्थी त्रूटी पुर्ततेनंतर पात्र ठरतील त्यांना सुध्दा सन २०१५-१६ अखेर सदर अर्थसहाय्य देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १९ विषय क्रमांक : ४
दिनांक : १४/०१/२०१५ विभाग : नागरवस्ती विकास योजना
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.स्वाती साने
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे प्रत्र क्र.नावियो/३/कावि/२००/२०१४, दि.०३/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. परदेशातील उच्च शिक्षण घेणा-या युवतींना अर्थसहाय्य देणे या योजनेकरिता जाहिर प्रकटनानुसार अर्ज मागविणेत आले होते. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात ९ अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जांची अटी शर्तीनुसार तपासणी केली असता ४ अर्ज पात्र झालेले असून ५ अर्ज अपात्र झाले आहेत. सदर पात्र लाभार्थींना प्रत्येकी र.रु.१,००,०००/- या प्रमाणे एकूण ४ लाभार्थीसाठी ४,००,०००/- (अक्षरी र.रु.चार लाख फक्त) इतका खर्च अपक्षित आहे. सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात “ परदेशातील उच्चशिक्षण अर्थसहाय्य ” या उपलेखाशिर्षावर रक्कम रुपये - २०,००,०००/- इतकी तरतूद असून आज अखेर खर्च र.रु.७,००,०००/- झाला असल्याने र.रु.१३,००,०००/- इतकी तरतूद शिल्लक आहे. त्यामधून खर्च करणेत येईल. पात्र लाभार्थींना अर्थसहाय्य अदा करणेकरीता येणा-या र.रु.४,००,०००/- (अक्षरी र.रु.चार लाख फक्त) चे खर्चास तसेच यानंतर अपात्रतेची पुर्तता करुन पात्र ठरणा-या लाभार्थींना अर्थसहाय्य देणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता

देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( जाधव साधना रामदास )
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३१ /२०१५
दिनांक : १४/०१/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Mahila-14-15\proceeding 11_Mahila.doc